सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०२५/५४३/ प्र.क्र.४९३/ पोल-५ ब, दि.०२/१२/२०२५

**विषय** :- पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या आस्थापनेवर पोलिस शिपाई संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.
श्री.चनबसय्या संगय्या संगमठ, पोलीस शिपाई /१६८३

*****

महाराष्ट्र शासन,गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०२५ / ५४३ / प्र.क्र.४९३/ पोल-५ ब, दि.०२/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२०२१५२८१२४६२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Sujata Krishna Pankar
Date: 03-12-2025
16:55:02
( सुजाता पानकर )
कार्यासन अधिकारी
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त,सोलापूर शहर.
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्थापना-२)
कार्यासन अधिकारी, का क्र.६

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके "सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या आस्थापनेवर पोलीस शिपाई संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत...**
**श्री.चनबसय्या संगय्या संगमठ,पोलीस शिपाई/१६८३**

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
**शासन निर्णय क्रमांक – संकीर्ण-१०२५/५४३/प्र.क्र.४९३/पोल-५ब,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - ०२ डिसेंबर, २०२५.

**वाचा :-** १) पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्था-२), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय यांचा दि. ०३.०७.२०२४ रोजीचा प्रस्ताव.
२) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २०(४).
३) अध्यक्ष, स्थायी वैद्यकीय मंडळ, श्री. छत्रपती शिवाजी महाराज, सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांचे दि.१४.१०.२०२२ रोजीचे वैद्यकीय प्रमाणपत्र.
४) डॉ. व्ही. एम. सरकारी मेडीकल कॉलेज आणि श्री. शिवाजी महाराज जनरल हॉस्पिटल, सोलापूर यांचे दिनांक ०५.१२.२०२४ रोजीचे दिव्यांग प्रमाणपत्र.
५) वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीने चक्रिय पद्धतीने दि.०१.१२.२०२५ अन्वये दिलेली मान्यता.

**प्रस्तावना :**

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या आस्थापनेवरील श्री. चनबसय्या संगय्या संगमठ, पोलीस शिपाई/१६८३ यांचा शासन सेवेतील भरती दिनांक ०५.११.१९९० असा असून, त्यांचा नियतवयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक ३१.०५.२०२६ असा आहे. श्री. संगमठ यांना डॉ. व्ही. एम. सरकारी मेडीकल कॉलेज आणि श्री. शिवाजी महाराज जनरल हॉस्पिटल, सोलापूर यांनी ८०% अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र दिले आहे.स्थायी वैद्यकीय मंडळ, छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय, सोलापूर यांनी दि.१४.१०.२०२२ अन्वये श्री. संगमठ यांना Let Hemiparesis Due to Rt Side Hemorrhagic Infarct Post Traumatic (accident) हा आजार दर्शवून Unfit For Duty असल्याचे अभिप्राय दिले आहेत. सदरहू मंडळाच्या अभिप्रायास अनुसरून, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर कार्यालयाच्या दि.१८.११.२०२२ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन), १९८२ मधील नियम क्र. ६८, ७२ मधील तरतूदींच्या अटीस अधीन राहून, श्री. संगमठ यांना दि.०७.११.२०२२ पासून रुग्णता सेवानिवृत्त केले. सदर आदेशाविरूध्द श्री. संगमठ यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई यांचेकडे मुळ अर्ज क्र.१२२/२०२३ दाखल केला आहे. सदरहू प्रकरणी मा. न्यायालयाने दि.०९.०६.२०२३ च्या आदेशान्वये पोलीस आयुक्त, सोलापूर शहर कार्यालयाचे दि.१८.११.२०२२ चे आदेश रद्द करून, श्री. संगमठ यांना अपंग व्यक्ती अधिकार नियम, २०१६ मधील नियम २०(४) प्रमाणे सेवेचे लाभ देण्याबाबतचे आदेश पारीत केले आहेत.

मा. न्यायालयाच्या आदेशास अनुसरून, श्री. संगमठ यांना सेवेत पुन:स्थापित करून, अधिसंख्य पदावर वर्ग केले व त्यांचेकरीता पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे आस्थापनेवर ते ज्या दिनांकाला सेवानिवृत्त झाले असते त्या दिनांकापर्यंत किंवा आजारातून बरे होईपर्यंत यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत पोलीस शिपाई दर्जाचे अधिसंख्य पद निर्माण करावयाचा पोलीस आयुक्त, सोलापूर शहर कार्यालयाने दि.१४.०७.२०२३ अन्वये पोलीस आयुक्त, सोलापूर शहर कार्यालयाचा प्रस्ताव पोलीस महासंचालक कार्यालयाने शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरून शासनाने अधिसंख्य पद निर्माण करण्याचा निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

दिव्यांग व्यक्ती अधिनियम, २०१६ च्या अनुच्छेद २०(४) नुसार, श्री. चनबसय्या संगय्या संगमठ, पोलीस शिपाई यांचेसाठी "पोलीस शिपाई" संवर्गाचे एक अधिसंख्य पद दि.०७.११.२०२२ ते त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत अथवा सदर पद रिक्त होईपर्यंत यांपैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने चक्रिय पध्दतीने मान्यता दिली आहे.

प्रस्तुत मान्यतेनुसार, श्री. चनबसय्या संगय्या संगमठ, पोलीस शिपाई, यांचे **एस-७ (२१७०० - ६९१००)** अधिक विशेष वेतन रु ७५०/- या वेतनश्रेणीतील वेतन काढण्यासाठी पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांचे अधिनस्त पोलीस शिपाई संवर्गातील एक अधिसंख्य पद दिनांक ०७.११.२०२२ पासून निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पद पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे.

३. सदर अधिसंख्य पद हे श्री. संगमठ यांच्यासाठी दि.०७.११.२०२२ ते नियतवयोमानानुसार सेवा निवृत्तीच्या दिनांकापर्यंत अथवा सदर पद रिक्त होईल, यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद आपोआप संपुष्टात येईल.

४. सदर पदाच्या वेतन व भत्त्यावरील खर्च हा "मागणी क्रमांक-बी-१, मुख्यलेखाशीर्ष २०५५-पोलीस उपलेखाशिर्ष, १०९, जिल्हा पोलीस दल, (००) (०१) जिल्हा पोलीस बल (अनिवार्य) २०५५०१६८-०१(वेतन)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय उच्च स्तरीय सचिव समितीने चक्रिय पद्धतीने घेतलेल्या निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५७०/आपुक, दिनांक ०१.१२.२०२५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२५१२०२१५२८१२४६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Digitally signed by RAVINDRA NAMDEV PATIL
Date: 2025.12.02 15:29:48 +05'30'

**(रविंद्र पाटील)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर.
३.महालेखापाल,(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य मुंबई/ नागपूर.
४.महालेखापाल (लेखा परीक्षा),महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
५. जिल्हा कोषागार, सोलापूर शहर
६.वित्त विभाग, आ.पु.क. कक्ष मंत्रालय,मुंबई.
७.सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८.निवडनस्ती, पोल ५-ब, गृह विभाग, मंत्रालय मुंबई-३२.